# कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | **पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९०७ /२०२४ दि. ०५ /०९/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, कल्याण** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. तसेच दि. १६/०९/२०२४ रोजी **'ईद–ए–मिलाद'** सणानिमित्त मोठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदर कालावधीत नमूद विसर्जन मार्गावर व मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**NO PARKING ZONE –** १) आधारवाडी सर्कल ते दुर्गामाता चौक, सहजानंद चौक ते दुर्गामाता चौक तसेच दुर्गामाता चौक ते उर्दु स्कूल दरम्यान संपूर्ण रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी **NO PARKING ZONE** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) कोनगाव कडून दुर्गाडी मार्गे कल्याण शहराचे दिशेने येणारी सर्व प्रकारची हलकी वाहने वाडेघर चौक/आधारवाडी चौकातून (दुर्गाडी चौक व परिसरातील मार्गावर गणेश मूर्ती विसर्जन मिरवणुकांमुळे रहदारीची कोंडी झाल्यास) इच्छित स्थळी जातील.

ब) कोळशेवाडी कडून कोनगाव दिशेने जाणारी सर्व हलकी वाहने गोविंदवाडी बायपास नाक्यावरून डावीकडे वळून गोविंदवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

क) कोनगाव बाजूकडून डोंबिवली – मानपाडा – कल्याण फाटा – शिळफाटा दिशेने जाणारी सर्व हलकी वाहने दुर्गाडी पुलाकडून दुर्गाडी – गोविंदवाडी बायपास मार्गाने इच्छित स्थळी जातील.

**NO PARKING ZONE –** २) दुर्गामाता चौक ते लाल चौकी दरम्यानचा मार्ग **NO PARKING ZONE** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** कोनगाव गणेश घाट व दुर्गाडी गणेश घाट येथील गणेश मूर्ती विसर्जन मिरवणुकांमुळे रहदारीची कोंडी झाल्यास नमूद मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्ग म्हणून कल्याण शहरातून गांधारी पूल मार्गे येवई नाका कडे व कल्याण कडे येण्यासाठी येवई नाक्यावरून गांधारी पूल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**<u>जड अवजड वाहने व सार्वजनिक बसेसना कल्याण शहरात प्रवेश बंद</u>** :–

१) **कल्याण शहरांतर्गत** मार्गावरून जड अवजड वाहनांचे वाहतुकीस मूर्ती विसर्जनाचे दिवशी सकाळी ०८:०० वा. पासून गणेश मूर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपावेतो पूर्णपणे मनाई करण्यात येत आहे.

२) कल्याण शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसेसना **दुर्गाडी, लाल चौकी, छत्रपती शिवाजी महाराज चौक** मार्गे **'प्रवेश बंद'** करण्यात येत असून सदर बसेस गोविंदवाडी बायपास पत्रीपूल, वल्लीपीर चौक, गुरूदेव हॉटेल मार्गे कल्याण स्टेशन व कल्याण एस. टी. आगार येथे जातील व त्याच मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) मुरबाड रोडने येणाऱ्या बसेस यांना **प्रेम ऑटो सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत असून सदर बसेस बिर्ला कॉलेज रोड, दुर्गाडी, गोविंदवाडी बायपास, पत्रीपूल, वल्लीपीर चौक गुरूदेव हॉटेल मार्गे कल्याण स्टेशन व कल्याण एस. टी. आगार येथे जातील व त्याच मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०८/०९/२०२४ रोजी (दीड दिवसाचे), दि. ११/०९/२०२४ रोजी (पाच दिवसाचे), दि. १२/०९/२०२४ रोजी (गौरी व गणपती), दि. १३/०९/२०२४ रोजी (सात दिवसाचे), दि. १४/०९/२०२४ रोजी (सार्वजनिक गणेशोत्सव मेळा संघ व एकादशी), दि. १५/०९/२०२४ रोजी (नऊ दिवसाचे) व दि. १७/०९/२०२४ रोजी (अनंत चतुर्थी) या कालावधीत दुपारी ११.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

CamScanner

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा.आयुक्त, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सपोआ कल्याण, उल्हासनगर वाहतूक विभाग प्रभारी अधिकारी, कल्याण, कोळसेवाडी, उल्हासनगर, विठ्ठलवाडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner